**सं.फौ.ख.क्र.१४४६/२०२४**
**बंकट वि. महेश**
**निशाणी क्रमांक ३० वर**

**फिर्यादीतर्फे साक्षीदार क्र.१– बंकट शहाजीराव मुळे यांचा उलटतपास आरोपीतर्फे विधीज्ञ श्री.एस.के.धरणे यांच्यामार्फत शपथेवर सुरु–**

९. माझ्याकडे शॉप ॲक्ट लायसन्स नाही. मी २० ते २१ वर्षांपासून शामसुंदर इलेक्ट्रीकल नावाने व्यवसाय करतो. माझी २०–२१ वर्षांपूर्वी आरोपी काम करत असलेल्या ठिकाणी मोटार दुरुस्त करण्याच्या निमीत्ताने ओळख झाली. सदर आरोपी दुकानामध्ये २००४ पासून जात असल्याबाबत कागदोपत्री पुरावा नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीची व माझी २०१९ नंतर संजय तुकाराम करकुले यांच्यामुळे ओळख झाली. २०१३ सालापासून आरोपी संजय करकुले यांच्यापासून विभक्त व्यवसाय करु लागला. सदर आरोपी काम करत असलेल्या ठिकाणी असलेली मशीनरी संजय करकुले यांची होती त्याबाबत माझ्याकडे पुरावा नाही. हे म्हणणे खरे आहे की, हरीओम इंजीनीअरींग वकर्स याचे शॉप ॲक्ट लायसन्स संजय करकुले यांच्या नावे होते. ते कोणत्या वर्षी संजय करकुले यांच्या नावे झाले याबाबत मला माहीती नाही. सदर परवाना मी पाहिलेला नाही. सदर परवाना २००४ पासून आरोपीच्या नावाने आहे किंवा कसे ते मला माहीती नाही. हे म्हणणे खरे नाही की, ते भागीदार होते. सदर वर्कशॉपमध्ये संजय करकुले हे मेन मालक होते. त्याबाबत माझ्याकडे पुरावा नाही. हे म्हणणे खरे नाही की, संजय करकुले मेन मालक असल्याचे खोटे सांगत आहे. आरोपी संजय करकुले यांच्यासोबत काम करत असलेल्या वर्कशॉपमधून विभक्त झाल्यावर सरिता प्लास्टीक नावाच्या औरंगाबाद येथील कंपनीत सेल्समनचे काम करत होता. सदर आरोपीच्या कुटुंबाची मला

माहीती नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी व माझी जुनी ओळख असल्याचे मी खोटे सांगीतले आहे. आरोपीच्या घरी मी एकदाही गेलेलो नाही. सदर आरोपी कव्हा रोड, संभाजी नगर, करडे किराणा दुकानाच्या मागे, शिवकृपा येथे राहतो. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या शपथपत्राच्या परिच्छेद क्र.१ मध्ये नमूद केल्याप्रमाणे आरोपी करडे किराणा दुकानाच्या मागे राहत असल्याचे खोटे सांगीतले आहे. साक्षीदार सांगतात की, सदर करडे किराणा दुकानाच्या जागेवर ओमसाई क्लॉथ सेंटर हे दुकान झालेले आहे. सदर ती जागा कोणाची आहे हे मला माहीत नाही. सदर ओमसाई क्लॉथ सेंटरपासून ३०० ते ४०० मीटरवर केंद्रे किराणा दुकान आहे किंवा कसे हे मला माहीती नाही. आरोपी राहत असलेले घर नेमके कोणाच्या नावावर आहे ते मला माहीती नाही. ते घर राजेश फडकरी यांचे आहे किंवा नाही तेदेखील मला निश्चीत माहिती नाही. आरोपीला परळीच्या घराच्या शेजारी प्लॉट घ्यायचा होता. सदर प्लॉट कोणाकडून, किती रुपयाला घेण्याचे ठरवले होते याबाबत मी आरोपीकडे विचारणा केली नाही. सदर प्लॉट आरोपीला कोणासाठी घ्यायचा आहे याची विचारणा केली नाही. सदर प्लॉट कधी घ्यायचा होता याबाबत माहीती नाही. सदर प्लॉट खरेदीसाठी आरोपी स्वतःकडे किती पैसे खर्च करणार होता व माझ्याकडे किती उसणे घेणार होता याची मला माहीती दिलेली नाही. आजपर्यंत आरोपीने प्लॉट घेतला किंवा नाही याची मी चौकशी केली नाही. सदर परळी येथे आरोपीचे घर कुंपनपाळे गल्ली या ठिकाणी असल्याचे आरोपीने सांगीतले होते. आरोपीसोबत यापूर्वी व्यवहार झालेला नाही. मी मोटार मेकॅनीक म्हणून काम करताना जोडव्यवसाय म्हणून शेती करतो. इतर कोणताही व्यवसाय करत नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी मार्केटमध्ये व्याजाने पैसे देण्याचे काम

करतो. हे म्हणणे खरे आहे की, मी आरोपीला दि.२२.०८.२०२३ रोजी सर्वप्रथम धनादेशाने पैसे दिले. हे म्हणणे खरे नाही की, दि.१० मे २०२२ रोजी आरोपी त्याला रु.६० हजार हवे असल्यामुळे माझ्याकडे आला. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळेस मी आरोपीला माझ्याजवळ एवढे पैसे नाहीत रु.३४ हजार आहेत तेवढे देतो व उदया रु.२० हजार फोन पे करतो असे सांगीतले. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपीला दि.१० मे २०२२ रोजी रु.३४ हजार ५०० दिले. हे म्हणणे खरे नाही की, त्याच दिवशी त्याने रु.६० हजार वरील ५ टक्के व्याज रु.३ हजार आरोपीने मला फोन पे केले. हे म्हणणे खरे आहे की, दि.११ मे २०२२ रोजी मी आरोपीला रु.२० हजार फोन पे ने दिले. साक्षीदार सांगतात ते पूर्वीच्या व्यवहारासंदर्भातील होते. दिनांक १५ मे २०२२ रोजी देखील मी रुपये ५ हजार ५०० आरोपीला फोन पे केले. साक्षीदार सांगतात नगदी रुपयांच्या बदल्यात फोन पे करण्याचे आमच्यात व्यवहार होत असत. हे म्हणणे खरे नाही की, सदर रु.६० हजार याकरीता आरोपीने फोन पे ने एकूण रु.३६ हजार व्याज दिलेले आहे तसेच काही रक्कम नगदी व्याजाकरीता दिली आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपीला घेवून स्वतः चिंचोलीराव वाडी येथे गेलो. हे म्हणणे खरे नाही की, तिथे गेल्यानंतर आरोपीला मी चेक वटवायला लावला व त्या ५० हजारापैकी रुपये अडीच हजार व्याज काढून घेतले.

प्रश्न – दिनांक २३.०९.२०२३ रोजी आरोपीने रु.अडीच हजार तुम्हाला व्याजापोटी दिले याबाबत काय सांगायचे आहे ?

उत्तर – सदर पैसे आरोपी मोटार घेवून आलेला होता त्याबाबतचे होते.

हे म्हणणे खरे नाही की, ऑक्टोबर २०२३ मध्ये पुन्हा आरोपीने रु.अडीच

हजार व्याजापोटी मला दिले. हे म्हणणे खरे नाही की, नोव्हेंबर २०२३ ला आरोपीने पुन्हा अडीच हजार रुपये व्याजापोटी मला दिले. साक्षीदार सांगतात हे सर्व व्यवहार मोटार दुरुस्ती संदर्भातील आहेत. हे म्हणणे खरे नाही की, डिसेंबर २०२३ रोजी मला आरोपीने रोखीने पैसे दिले होते. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीला मी मला फोन पे ने पैसे दयायचे नाहीत अशी सक्त ताकीद दिली. हे म्हणणे खरे नाही की, दि.०६ डिसेंबरला देखील आरोपीच्या खात्यावर पैसे टाकलयावर त्याच्याकडून नगदी रु.२५०० व्याजापोटी घेतले. हे म्हणणे खरे नाही की, मी लातूर मार्केट मध्ये ब–याच जणांना ५ टक्के व्याजाने पैसे देण्याचा व्यवसाय करतो. सदर आरोपीची सर्व मशीनरी संजय करकुले यांनी विकत घेतली किंवा कसे हे मला माहीती नाही. सदर मशीनरीचे पैसे संजय करकुले यांनी आरोपीला चार–पाच वर्षे दिले नाहीत किंवा कसे ते मला माहीती नाही. २०१८ मध्ये आरोपीने संजय करकुले यांच्याकडे पैशांची वारंवार मागणी केली किंवा कसे ते मला माहीती नाही. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी संजय करकुले यांनी बिगर सहीचा कोरा चेक आरोपीकडून मागीतला. हे म्हणणे खरे नाही की, सदर संजय करकुले यांना आरोपीने बिगर सहीचा धनादेश त्यांच्याकडून पैसे मिळावे या उद्देशाने दिला होता. सदर संजय करकुले यांनी आरोपी पैसे परस्पर वसूल केले किंवा कसे या त्यांच्या व्यवहाराबाबत माहीती नाही. हे म्हणणे खरे नाही की, सदर त्यामुळे आरोपी व संजय करकुले यांच्यामध्ये वितुष्ट आले. हे म्हणणे खरे नाही की, सदर डिसेंबर २०२३ मध्ये एक लाख रुपये आरोपीने परत करुन तो लातूर सोडून बाहेरगावी गेला. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी डिसेंबर २०२३ पासून मनोज प्रभू खोबरे यांची गाडी क्र.एम.एच.१४ जी.डी.९९७८ या गाडीवर ड्रायव्हर म्हणून काम करत होता. हे म्हणणे खरे

नाही की, मी दि.१८.०१.२०२४ रोजी चिंचोलीराव वाडी येथील बँक आफ महाराष्ट्र मधून रुपये १ लाख काढून आरोपीला दिले हे खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, सदर पैसे मला आरोपीला फोन पे ने देता आले असते. सदर त्याबाबत माझ्याकडे लेखी पुरावा नाही. सदर रुपये १ लाख आरोपीला दिल्यानंतर त्याबाबत त्याच्याकडून पावती किंवा लेखी कागद करुन घ्यावा असे मला वाटले नाही. हे म्हणणे खरे आहे की, सदर रुपये २० हजार च्या वरील रक्कम रोखीने देवू नये असा कायदा आहे. साक्षीदार सांगतात सदर रक्कम विश्वासापोटी दिली आहे. हे म्हणणे खरे नाही की, दि.१८.०१.२०२४ रोजी आरोपी लातूरमध्ये नव्हता व त्याला मी रुपये १ लाख दिले नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीला दि.१८.०१.२०२४ रोजी रु.१ लाख दिल्याबाबत माझ्याकडे लेखी पुरावा नाही. हे म्हणणे खरे नाही की, दि.०५.०२.२०२४ रोजी लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लातूर शाखा गुळ मार्केट येथील खात्यातून रुपये ३ लाख काढून आरोपीला दिल्याचे मी खोटे सांगत आहे. सदर बँक ऑफ महाराष्ट्रच्या खात्यावर रु.१ लाख शेतीतील ऊसाचे बिले यावरुन आले होते. सदर माझ्या नावे बँक ऑफ महाराष्ट्रचे ३ लाख कर्ज आहे.

प्रश्न – बँकेतून कर्ज घेवून आरोपीला पैसे दिले असे घडले का ?

उत्तर – तसे नाही. मी बँकेतून कर्ज १ लाख ९५ हजार घेतले व त्यापैकी १ लाख रुपये आरोपीला दिले व उर्वरीत रक्कम मी माझ्याकरीता वापरली.

हे म्हणणे खरे नाही की, सदर कर्जासंदर्भात उचललेले पैसे रुपये ५० हजार, रुपये ७५ हजार व रुपये १ लाख ९५ हजार हे मी माझ्या कामासाठी वापरले असून आरोपीला दिलेले नाहीत.

प्रश्न – कोणताही शहाणा माणूस कर्ज घेवून उसणे पैसे देत नाही याबाबत काय सांगायचे आहे ?

उत्तर – आमचा विश्वास असल्यामुळे आम्ही आरोपीला पैसे दिले.

सदर नोटीसमध्ये कर्ज घेवून पैसे दिल्याचे लिहीलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने माझ्याकडून वेळोवेळी घेतलेले पैसे व्याजासकट मला परत केले आहेत. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी माझे कसल्याही प्रकारचे देणे लागत नाही. सध्या माझे दुकान संजय करकुले यांच्या वर्कशॉपच्या जागेमध्ये आहे. हे म्हणणे खरे नाही की, संजय करकुले यांनी आरोपी महेश फडकरी कडून २०१८ साली घेतलेल्या धनादेशाचा गैरवापर करुन खोटी सही करुन धनादेश बँकेत लावला आहे. हे म्हणणे खरे आहे की, ज्या दिवशी मी आरोपीला पैसे दिले त्या दिवशी आरोपीने धनादेश दिला असे घडले नाही. माझ्या प्रतिज्ञापत्रातील परिच्छेद क्र.३ मध्ये नमूद केल्याप्रमाणे आरोपीने धनादेश लिहून आणला व मी, गजेंद्र गड्डीमे व संजय करकुले यांच्या समक्ष सही करुन मला दिला. सदर बाब दि.१३.०५.२०२३ रोजी वकीलांमार्फत आरोपीला पाठवलेल्या नोटीसमध्ये नमूद केलेली नाही. सदर नोटीसमध्ये का उल्लेख केला नाही याचे कारण मी सांगू शकत नाही. गजेंद्र गड्डीमे चेक देताना उपस्थीत असल्याचे देखील नोटीसमध्ये नमूद केले नाही. गजेंद्र यांच्या वडीलांचे नाव अंतराम असे आहे. हे म्हणणे खरे आहे की, धनादेश लिहीताना निशाणी क्र.३३ वर प्रत्येक चौकोनात एक अंक लिहीणे अपेक्षीत आहे. मी सातवी पर्यंत शिकलो आहे. सदर धनादेशावर महिन्याच्या जागेवर १४ व वर्ष १०२४ असे नमूद केले आहे हे खरे नाही. साक्षीदार सांगतात धनादेश आरोपीने लिहीलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, धनादेशावरील तारीख, रक्कम, नाव, सही सर्व मी व करकुले यांनी टाकले

आहे. हे म्हणणे खरे नाही की, सदर धनादेशावर आरोपीची सही नाही. हे म्हणणे खरे नाही की, संजय करकुले व आरोपी यांच्यात जमत नसल्यामुळे तसेच माझे वर्षभराचे व्याज दिले नाही याचा राग मनात धरुन सदर खोटा धनादेश लावून खोटी केस दाखल केली. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीला नोटीस मिळू नये म्हणून खोटे पत्ते टाकले आहेत. हे म्हणणे खरे नाही की, परळी येथे आरोपी कधीही राहत नव्हता व लातूर येथेदेखील २०२३ पासून राहत नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, मी पाठवलेली नोटीस आरोपी लातूर येथे राहत नसल्यामुळे मिळाली नाही. मी रजिस्टर पोस्टाने नोटीस पाठवली होती. हे म्हणणे खरे नाही की, सदर पाकीट आरोपीच्या घरापर्यंत न जाता सुचना दिली असे खोटे लिहून परत पाठवले. हे म्हणणे खरे नाही की, परळी येथे पत्त्यावरील पाकीट देखील त्याच कारणाने परत केले. सदर परत आलेल्या सुचना परत आरोपीला स्वतः जावून देण्याचा प्रयत्न केला नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीला नोटीसा मिळाल्या नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी लातूर येथे राहत नसताना समन्स घेण्यास इन्कार केला असा खोटा रिपोर्ट दयायला लावला. हे म्हणणे खरे नाही की, कोर्टाची दिशाभूल करुन आरोपीला वॉरंट काढण्यास सांगीतले. हे म्हणणे खरे आहे की, वॉरंट लातूरच्या पत्त्याचे होते. हे म्हणणे खरे नाही की, संजय करकुले यांना मी आरोपीची रु.५ हजाराची जामीन घ्यायला लावली. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपीला ५ लाख रुपये कधीही दिले नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, जे पैसे आरोपीला दिले होते त्याची त्याने व्याजासकट परतफेड केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, व्याज बुडाल्याच्या कारणावरुन व संजय करकुले यांचा आरोपीवर राग असल्यामुळे

आरोपीच्या बिना सहीच्या धनादेशाचा वापर केला.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर निवेदन स्वीकृत

Digitally signed by AVANI ASHWIN GODSE
Date: 2026.08.13 18:18:56 +0530

(श्रीमती अ.अ.गोडसे)

दिनांकः १३.०८.२०२६ अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी,

लातूर.